# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळमजला, पुणे

फोननं.(०२०) २६०५०६४१ ई-मेलआयडी :- sceapune@gmail.com

---

**निवडणूक महत्वाचे कालमर्यादा**

जा. क्र. रासनिप्रा/कक्ष-११/ कोल्हापूर/दूध संघ/नि. कार्य/ मंजूरी/ १९८ /२०२१
दिनांक : २३/०३/२०२१

**वाचावे**:- १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३ कब

२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४

३. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब अधिसुचना दिनांक ०६.०८.२०१८ रोजी प्रसिध्द झालेले महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) (प्रथम सुधारणा) नियम २०१७

४. मा. उच्च न्यायालय, मुख्यपीठ मुंबई याचिका क्र. ४६६/२०२१ मधील आदेश दि.१०/०२/२०२१

५. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग आदेश क्रमांक संकीर्ण/०१२०/प्र. क्र. ७०/१३-स दि. २४/०२/२०२१

६. मा. उच्च न्यायालय, मुख्यपीठ मुंबई याचिका क्र.(स्टॅम्प) ५३२७/२०२१ मधील आदेश दि.१२/०३/२०२१

७. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), पुणे विभाग, पुणे यांचे जा. क्र. प्रादुविअ/पुणे/क-१/कोल्हापूर दूध संघ/निवडणूक/निनिअ नियुक्ती/२३०६/२०२१ दि. १५/०३/२०२१

८. प्राधिकरणाकडील जा. क्र. रासनिप्रा/कक्ष-११/कोल्हापूर दूध संघ/निनिअ आदेश/११२६/२०२१ दि. १८/०३/२०२१

९. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) पुणे विभाग, पुणे यांचे जा. क्र. प्रादुविअ/क-१/जिल्हा निवडणूक/२३६०/२०२१ दि. २२/०३/२०२१

**प्रस्तावना:-**

ज्या अर्थी, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ नियम ३ (v) नुसार राज्यातील संचालक मंडळाची मुदत संपलेल्या सहकारी संस्थांच्या निवडणुक प्रक्रिया सुरु करणेचे घोषणा / आदेश जिल्हा/ तालुका / वार्ड सहकारी निवडणुक अधिकारी यांना उपरोक्त वाचावे क्रमांक २ व ३ मधील तरतूदीनुसार दिलेले आहेत. आणि,

ज्या अर्थी, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) पुणे विभाग, पुणे यांनी **कोल्हापूर** जिल्ह्यातील **कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या. कोल्हापूर** या संस्थेची निवडणूक प्रक्रिया चालू केलेली असून सदर संस्थांचा वाचावे क्रमांक ४ नुसार नियम **४(I)(१०)** नुसार अ प्रकारात समावेश होत असून सदर संस्थेची **दि.१२/०३/२०२१** रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द केलेली आहे. आणि,

ज्याअर्थी, वाचावे क्र. ४ नुसार मा. उच्च न्यायालय, मुख्यपीठ मुंबई याचिका क्र. ४६६/२०२१ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. १०/०२/२०२१ रोजी आदेश पारीत करुन कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या., कोल्हापूर या संस्थेची निवडणूक प्रक्रिया सुरु करणेबाबत निर्देश देवून सदर याचिका निकाली काढलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, शासनाने वाचावे क्र. ५ च्या आदेशानुसार ज्या प्रकरणी मा. उच्च/मा. सर्वोच्च न्यायालयाने निवडणूका घेण्याचे आदेशित केलेले आहे. अशा सहकारी संस्था तसेच २५० पेक्षा कमी सदस्य संख्या असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्था वगळून, राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका या आदेशाच्या दिनांकापासून ज्या टप्प्यावर असतील त्या टप्प्यावर दिनांक ३१/०३/२०२१ पर्यंत पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत. तसेच ज्या सहकारी संस्थांच्या निवडणूका या आदेशान्वये पुढे ढकलण्यात आलेले नाही त्यांच्या निवडणूका घेण्याबाबत शासनाच्या कोव्हिड-१९ संदर्भातील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन निवडणूका घेण्याबाबतची कार्यवाही करणेबाबत आदेशित केलेले आहे. आणि,

ज्या अर्थी, मा. उच्च न्यायालय, मुख्यपीठ मुंबई यांनी रिट याचिका क्र.(स्टॅम्प) ५३२७/२०२१ मध्ये वाचावे क्र. ६ नुसार आदेश पारीत करुन कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या., कोल्हापूर या संस्थेची निवडणूक प्रक्रिया शासन आदेश दि. २४/०२/२०२१ अनुसार पुढे सुरु ठेवणेबाबत आदेशित केलेले आहे.आणि,

ज्या अर्थी, वाचावे क्र. ७ नुसार **जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) पुणे विभाग, पुणे** यांनी विनंती केल्यानुसार प्राधिकरणाने वाचावे क्र.८ चे आदेशान्वये उक्त संस्थेवर निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून **श्री. वैभव नावडकर, उपविभागीय अधिकारी, करवीर** यांची नियुक्ती केलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) पुणे विभाग, पुणे यांनी वाचावे क्र. ०९ च्या प्रस्तावानुसार **कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या. कोल्हापूर** या संस्थेच्या निवडणूक कार्यक्रमास मान्यता देणेबाबत विनंती केलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, निवडणूक नियम १८ नुसार निवडणूक कार्यक्रमास प्राधिकरणाने मान्यता देणेची तरतुद आहे.आणि,

त्या अर्थी, प्राधिकरण उक्त निवडणुक कार्यक्रमाबाबत पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

**-: आदेश:-**

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ चा नियम १८ नुसार प्राधिकरणास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या. कोल्हापूर** या संस्थेच्या निवडणूक कार्यक्रम मंजूर करीत आहे.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने.**

23/03/2029

(यशवंत गिरी)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रति,**

१. श्री. वैभव नावडकर, निवडणूक निर्णय अधिकारी, कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या. कोल्हापूर तथा उपविभागीय अधिकारी, करवीर विभाग करवीर

   त्यांनी जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ व संस्थेचे मंजुर उपविधीनूसार निवडणुक पार पाडून अहवाल जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांच्या मार्फत सादर करावा.

२. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) पुणे विभाग, पुणे

३. कार्यकारी संचालक, कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या. कोल्हापूर

नमुना ई-४ ( महाराष्ट्र सहकारी संस्था ( समिती निवडणूक ) नियम २०१४ चे नियम ११ पहा)

णूक निर्णय अधिकारी- वैभव नावडकर

पदनाम-उपविभागीय अधिकारी, करवीर

निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय- उपविभागीय अधिकारी करवीर यांचे कार्यालय जिल्हाधिकारी कार्यालय परिसर नागाळा पार्क कोल्हापूर

सहकारी संस्थेचे नाव- कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि.कोल्हापूर (गोकुळ) जि.कोल्हापूर.

महाराष्ट्र सहकारी संस्था ( समिती निवडणूक ) नियम २०१४ चे नियम १९ अन्वये निवडणूक कार्यक्रमातील विविध टप्पे

निवडणूक वर्ष सन २०२१ ते २०२६

| मतदार संघाचे नाव व निवडून द्यावयाची सदस्य संख्या | | दाखल नामनिर्देशन करण्याचा दिनांक, वेळ व ठिकाण | प्राप्त नामनिर्देशनांची यादी प्रसिध्दीचा दिनांक, वेळ व ठिकाण | नामनिर्देशन पत्र छाननीचा दिनांक, वेळ व ठिकाण | वैध नामनिर्देशन पत्रांची यादी,प्रसिध्दीचा दिनांक, वेळ व ठिकाण | ज्या दिनांकास उमेदवारी मागे घेता येईल तो दिनांक, वेळ व ठिकाण | निवडणूक लढविणा-या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्दीचा व चिन्हांचे वाटप करण्याचा दिनांक, वेळ व ठिकाण | आवश्यक असल्यास मतदान ज्या दिनांकास घेण्यात येईल तो दिनांक, वेळ व ठिकाण | मतमोजणी दिनांक, वेळ व ठिकाण | मतमोजणी चा निर्णय घोषित करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| सर्वसाधारण | १६ | दि.२५.०३.२०२१ ते ०१.०४.२०२१ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० पर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात | दि.२५.०३.२०२१ ते ०१.०४.२०२१ रोज जसजशी प्राप्त होतील त्याप्रमाणे रोज संध्याकाळी ४.०० वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.०५.०४.२०२१ सकाळी ११.०० ते छाननी संपेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय | दि.०६.०४.२०२१ सकाळी ११.०० वाजता निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय व संस्था कार्यालय नोटीस बोर्ड | दि.०६.०४.२०२१ ते २०.०४.२०२१ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० पर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय | दि.२२.०४.२०२१ सकाळी ११.०० वाजता निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय व संस्था कार्यालय नोटीस बोर्ड | दि.०२.०५.२०२१ सकाळी ८.०० वा. ते संध्या. ५.०० पर्यंत ठिकाण नंतर जाहीर करणेत येईल | दि.०४.०५.२०२१ सकाळी ८.०० वाजता ठिकाण नंतर जाहीर करणेत येईल | दिनांक ०४/०५/२०२१ मतमोजणी संपलेनंतर लगेच |
| अनुसूचित जाती/जमाती | १ | | | | | | | | | |
| विमुक्त जाती/भटक्या जमाती/ वि.मा.प्रवर्ग | १ | | | | | | | | | |
| इतर मागासवर्गीय | १ | | | | | | | | | |
| महीला राखीव | २ | | | | | | | | | |
| एकूण | २१ | | | | | | | | | |

रा. क्र. रासनिप्रा/कक्ष-९/अ-ब वर्ग/नि.का.मंजुरी ११९८/सन २०२१ दि.23/03/2021

क २५.०३.२०२१ रोजी निवडणूक कार्यक्रम निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय व संस्था कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेत येईल.

डणूक कामकाज शासकीय / सार्वजनिक सुट्टीखेरीज सुरु राहील. ३.संघाची अंतिम मतदार यादी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात विकत मिळेल.

त्वारांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द केलेल्या चिन्हांच्या यादीमधून चिन्हे निवडावयाची आहेत. ५. निवडणूक चिन्हांचे वाटप स्तंभ ८ मधील दिनांकास व ठिकाणी सकाळी ११.०० वाजता करणेत येईल.

. शर्ती व सामान्य सूचना या निवडणूक निर्णय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, करवीर यांचे कार्यालय, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध)पुणे विभाग, पुणे, तसेच सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध)
ूर.

डणूक अधिकारी यांचे कार्यालय- उपविभागीय अधिकारी करवीर यांचे कार्यालय जिल्हाधिकारी कार्यालय परिसर नागाळा पार्क कोल्हापूर

क्रमांक ०२३१-२६५१७३४

Email-gokulelection२०२१@gmail.com

सही
(वैभव नावडकर)
निवडणूक निर्णय अधिकारी
उपविभागीय अधिकारी करवीर

सही
प्रभारी जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी
तथा उपविभागीय उपनिबंधक दुग्ध पुणे विभाग

23/03/2021
(जशवंत गिरी)
सही सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, म.रा.पुणे

Scanned with CamScanner